Date: 29.01.2024

**नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी , पशुपालक, युवकांसाठी कौशल्य विकास आधारित किफायतशीर शेळीपालन या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न....**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, धुळे व आत्मा, कार्यालय,नंदुरबार यांचे माध्यमातून तीन दिवसीय किफायतशीर शेळीपालन या विषयावरती प्रशिक्षण संपन्न. सदर प्रशिक्षण उदघाटन कार्यक्रम डॉ. राहुल देसले,प्राचार्य घटक कृषी तंत्र विद्यालय, धुळे, डॉ.दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, श्री. जगदीश कथेपुरी,शास्त्रज्ञ,कृषि विद्या,कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ धनराज चौधरी, शास्त्रज्ञ, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ.दिनेश नांद्रे यांनी केले, प्रास्तविका मध्ये त्यांनी प्रशिक्षणाचा उद्देश सांगत, कृषी बरोबर कृषी पूरक व्यवसाय यामध्ये शेळी पालनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.राहुल देसले यांनी शेळी पालनाची सध्यस्थिती व ग्रामीण अर्थव्यवस्थे मधील शेलीपालनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच जास्तीत जास्त पशुपालाकांनी शेतकरी प्रशिक्षणा मध्ये सहभाग नोंदवत शेलीपालानातील शास्त्रीय बाबी समजून घेवून नियोजन करण्याचे आव्हान केले.

सदर तीन दिवसीय तांत्रिक चर्चा सत्रामध्ये डॉ. धनराज चौधरी, डॉ. मिलिंद भंगे, सहायकउपायुक्त,पशुसंर्धन पशुसंर्धन विभाग, धुळे, प्रा. विपुल वसावे,सहायक प्राध्यापक, डॉ.संदीप पोळ, सहायक प्राध्यापक, कृषी महाविद्यालय, धुळेश्री.रोहित कडू, श्री. जगदीश काथेपुरी, व श्री. जयराम गावित यांचे मार्गदर्शन लाभले यात प्रामुख्याने शेळी पालन व्यवसायाची ओळख, शेळीपालन कशाकरिता, शेळीपालनाचे फायदे, भारतातील/महाराष्ट्रतील शेळयांच्या जाती व त्यांचे वैशिष्टे, शेळीपालनाच्या पद्धती, शेळयांच्या कारदांचे संगोपन व आहारव्यवस्थापन इत्यादी, शेळयांचे निगा, आहार व्यवस्थापन, नर निगा, आहार व्यवस्थापन, पशु पैदास धोरण, शेळयांची निगा लसीकरण व रोग व्यवस्थापन, दुध व मांस खरेदी विक्री व्यवस्थापण, विविध शासकीय योजना माहिती, प्रकल्प अहवाल तयार करावयाची माहिती, गट शेती संकल्पना व महत्व, इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले सदर प्रशिक्षणामध्ये ग्रामीण युवक, शेतकरी, पशुपालक, यांनी सहभाग नोंदवला.

या  प्रशिक्षणाचे संचालन डॉ.धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.पंकज पाटील, यांनी मानले. चर्चा सत्र यशस्विते साठी कु.अमृता राऊत, डॉ.आतिश पाटील,,कु.प्राची काळे,श्री.स्वप्नील महाजन, श्री.बाळू वाघ, श्री.कुमार भोये, श्री.रमेश शिंदे, श्री. कुणाल राजळे, श्री. जीवन राणे इ. कृषी विज्ञान केद्र धुळे अधिकारी,कर्मचारी तसेच कृषी विभाग व आत्मा कार्यालय, नंदुरबार यांचे सहकार्य लाभले.